| MHKO100004092008 | **नियमीत दिवाणी दावा क्र. ९२/२००८**<br><br>रामू धडाम – म.वा. वगैरे.<br>//विरुध्द//<br>भिमराव पाटील – म.वा. वगैरे. |
|---|---|

## निशाणी क्र. १३२ वर आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज वादी क्र.३(२) श्रीमती सुगंधा पांडूरंग पाटील यांना दाव्यातून कमी (डिलीट) करण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादींतर्फे अर्जाचे मागील पानावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. वादी यांनी सदरचा दावा हा फिल्ड होऊन स्वतंत्र तुटक कब्जा देवविणेबाबत व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शणास येत आहे की, वादी क्र.३(२) श्रीमती सुगंधा पांडूरंग पाटील हया दिनांक १९/११/२०२५ रोजी मयत झालेल्या आहेत. वादींचे कथनानुसार मयत वादी क्र.३(२) श्रीमती सुगंधा पांडूरंग पाटील यांना वादी क्र.३(१) महादेव, वादी क्र.३(३) सुमल, वादी क्र.३(४) सुधा, वादी क्र.३(५) सरिता व वादी क्र.३(६) सुवर्णा हेच वारस असून ते दाव्यात पक्षकार म्हणून सामील आहेत. त्यामुळे, त्यांनी वादी क्र.३(२) श्रीमती सुगंधा पांडूरंग पाटील यांचे नांव प्रस्तुत दाव्यातून कमी करण्याची विनंती केलेली आहे. प्रतिवादींतर्फे म्हणणे दाखल करुन विलंबाबाबत कोणतेही कारण दाखल केले नसल्याचे कथन केले. परंतु, प्रतिवादींनी वादी क्र.३(२) श्रीमती सुगंधा पांडूरंग पाटील यांना प्रस्तुत दाव्यातील इतर वादींव्यतिरिक्त आणखी कोण वारस आहेत किंवा कसे याबाबत स्पष्टपणे नमुद केलेले नाही. तसेच, प्रस्तुतचा दावा हा फिल्ड होऊन स्वतंत्र तुटक कब्जा देवविणेबाबत व मनाईकरीता दाखल केलेला असल्याने वादी क्र.३(२) श्रीमती सुगंधा पांडूरंग पाटील यांना प्रस्तुत दाव्यातून वगळल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नसुन दाव्याच्या गुणदोषावर कोणताही परिणाम होणार नाही. त्यामुळे, वादी क्र.३(२) श्रीमती सुगंधा पांडूरंग पाटील यांचे वारस पूर्वीच अभिलेखावर

पक्षकार म्हणुन सामील असल्याने त्यांचे नांव दाव्यातून कमी करणे योग्य होईल. सबब, मी पुढील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| ०१. | अर्ज मंजुर करण्यात येतो. |
| ०२. | **वादी क्र.३(२) श्रीमती सुगंधा पांडूरंग पाटील** यांचे नांव दाव्यातून कमी (डिलीट) करण्यात येते. |
| ०३. | वादी यांनी सदरची दुरुस्ती १४ दिवसांच्या आत दाव्यामध्ये करुन त्याअनुषंगाने दुरुस्त दाव्याची प्रत न्यायालयात सादर करावी. |
| | ( खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला ) |

Digitally signed by MATKAR SHEETAL SHIVAJI
Date: 2026.07.15 18:04:44 +0530

**( शीतल एस. मतकर )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः १५/०७/२०२६.